क्र.२/नसवि/प्रशासक/०५/२०२४-२०२५
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :-०२ ऑगस्ट २०२४

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## प्रशासक सभा क्रमांक - ०५/२०२४-२०२५
## स्थायी समिती सभा कामकाजाकरिता प्रशासक सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना स्थायी समितीची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, स्थायी समितीच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **सोमवार दि.०५/०८/२०२४ रोजी दु.१२.०० वाजता महानगरपालिका मंगलधाम कार्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

## परिशिष्ठ

१. मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.१५/०७/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील जलशुद्धीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक ब्लिचिंग पावडर केमिकलची वार्षिक आवश्यक ८० मे.टन. स्पेसिफिकेशनप्रमाणे दरकरार एजन्सी नियुक्ती करुन खरेदी करणे अंदाजित र.रु.२५,४८,८००/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये जाहिर ई महा टेंडर पद्धतीने निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त-२ (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.३०/०७/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

३. महानगरपालिका क्षेत्रातील प्र.स.क्र.१,२,३ व ४ च्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांचे डिपार्टमेंटली डांबरी पॅचवर्क करणे (खड्डे भरणे) अंदाजित र.रु.२,०,२२,४२५/- मात्रचे कामी विहित मुदतीत प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक मोहन शंकर कुंभार,सांगली यांची निविदा र.रु.२,१२,१३,६५७/- मात्र रक्कमेपेक्षा ०.०००१% कमी दराची निविदा प्राप्त झाली असून, मा.आयुक्तसो यांचेशी झाले वाटाघाटीअंती श्री.कुंभार यांनी निविदा रक्कमेपेक्षा ०.५०% कमी दराने कामगिरी करणेस तयार असलेबाबत लेखी पत्र दिलेने, सदरची कामगिरी मोहन शंकर कुंभार,सांगली यांचेकडून निविदा रक्कमेपेक्षा ०.५०%कमी दराने करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त-२ (बांधकाम विभाग) यांचे दि.३१/०७/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

४. माळबंगला ५६ एमएलडी जलशुध्दीकरण केंद्राची गाळणी क्षमता कमी झाल्याने सदर पाणी ७० एमएलडी जलशुध्दीकरण केंद्रावर शुध्द करुन पाणी नवीन पंपाद्वारे ५६ एम.एल.डी. संप व पंप हाऊसला देणे कामाची निविदा रद्द करुन मक्तेदार महाराष्ट्रा इंजिनिअरिंग सर्व्हिसेस सांगली यांनी भरलेली सुरक्षा अनामत व ई.एम.डी. परत करणेस मान्यता मिळणेबाबत **अतिरिक्त आयुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०२/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

५. महानगरपालिका क्षेत्रातील ओला व सुका कचरा Transfer Station मध्ये संकलित करण्याकरीता नविन ४.५ क्युबीक मीटर क्षमतेचे कंटेनर खरेदी करणे अंदाजित र.रु.४८,३६,७००/- मात्रचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर ई-टेंडरद्वारे निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेकामी **उपायुक्त मुख्यालय (आरोग्य विभाग) यांचे दि.०२/०८/२०२४ रोजीच विषयपत्र.**

६. दैनिक परवाना फी अनुषंगाने ई लिलाव, आणि ई टेंडर प्रक्रिया निर्णय घेणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे विषयपत्र.**

७. सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या शासन अनुदाने व मनपा निधी गुंतवणूकीचे अधिकार मा.उपायुक्त,मुख्यालय यांना प्रदान करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त मुख्यालय (लेखा विभाग) यांचे दि.०२/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

८. शासना कडून प्राप्त झालेल्या रस्ता अनुदान या निधीतून सांगली एस टी स्टॅन्ड ते आझाद चौक या रस्त्याचे दुरुस्तीकामी र.रु.१.५० कोटी मात्रचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरीस्तव पाठविणेस मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०२/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

९. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना – केंद्र पुरस्कृत लाभार्थी हिस्सा नसलेलया मासळी बाजार उभारण्याच्या कामाची जाहिर निविदा प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत राबविणेस मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०५/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

**मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने** }

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०५/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- २०** **दिनांक :- ०५/०८/२०२४**

**विषय क्रमांक :- ०१**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.१५/०७/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१६ ते ठराव क्र.१९ हे वाचून दाखविण्यात आले. सदर कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती लिपीक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०५/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक** :- २१ **दिनांक** :- ०५/०८/२०२४

**विषय क्रमांक** :- ०२

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त-२ (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.३०/०७/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील जलशुद्धीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक ब्लिचिंग पावडर केमिकलची वार्षिक आवश्यक ८० मे.टन. स्पेसिफिकेशनप्रमाणे दरकरार एजन्सी नियुक्ती करुन खरेदी करणे अंदाजित र.रु.२५,४८,८००/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये जाहिर ई महा टेंडर पद्धतीने निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

कार्यकारी अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०५/२०२४-२५

**दिनांक :- ०५/०८/२०२४**

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- २२**

**विषय क्रमांक :- ०३**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये;

सोबतचे अतिरिक्त आयुक्त-२ (बांधकाम विभाग) यांचे दि.३१/०७/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

महानगरपालिका क्षेत्रातील प्र.स.क्र.१,२,३ व ४ च्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांचे डिपार्टमेंटली डांबरी पॅचवर्क करणे (खड्डे भरणे) अंदाजित र.रु.२,५०,२२,४२५/- मात्रचे कामी विहित मुदतीत प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक मोहन शंकर कुंभार,सांगली यांची निविदा र.रु.२,१२,१३,६५७/- मात्र रक्कमेपेक्षा ०.०००१% कमी दराची निविदा प्राप्त झाली असून, मा.आयुक्तसो यांचेशी झाले वाटाघाटीअंती श्री.कुंभार यांनी निविदा रक्कमेपेक्षा ०.५०% कमी दराने र.रु.२,११,०७,५८९/- मात्रची कामगिरी करणेस तयार असलेबाबत लेखी पत्र दिलेने, सदरची कामगिरी मोहन शंकर कुंभार,सांगली यांचेकडून निविदा रक्कमेपेक्षा ०.५०%कमी दराने करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदीमधून होणेचा आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सत्य प्रतिलिपी (हस्ताक्षर)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०५/२०२४-२५

दिनांक :- ०५/०८/२०२४

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक** :- २३

**विषय क्रमांक** :- ०४

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०२/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

माळबंगला ५६ एमएलडी जलशुध्दीकरण केंद्राची गाळणी क्षमता कमी झाल्याने सदर पाणी ७० एमएलडी जलशुध्दीकरण केंद्रावर शुध्द करुन पाणी नवीन पंपाद्वारे ५६ एम.एल.डी. संप व पंप हाऊसला देणे कामाची निविदा रद्द करुन मक्तेदार महाराष्ट्रा इंजिनिअरिंग सर्व्हिसेस सांगली यांनी भरलेली सुरक्षा अनामत व ई.एम.डी. परत करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

कार्यकारी अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०५/२०२४-२५

दिनांक :- ०५/०८/२०२४

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक** :- २४

**विषय क्रमांक** :- ०५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (आरोग्य विभाग) यांचे दि.०२/०८/२०२४ रोजीच विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

महानगरपालिका क्षेत्रातील ओला व सुका कचरा Transfer Station मध्ये संकलित करण्याकरीता नविन ४.५ क्युबीक मीटर क्षमतेचे कंटेनर खरेदी करणे अंदाजित र.रु.४८,३६,७००/- मात्रचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर ई-टेंडरद्वारे निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

वैधकिय आरोग्याधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०५/२०२४-२५

**दिनांक :- ०५/०८/२०२४**

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :-** २५

**विषय क्रमांक :- ०६**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०२/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीमधील साधारणपणे ५ X ४ मापाच्या जागेत भाजीपाला, फळ विक्रेते, यांची माहिती खालील प्रमाणे यांचेकडून प्रतिदिनी र. रु. १०/- तर कपडे अन्य व्यवसायीक यांच्याकडून प्रतिदिनी र.रु. १५/- प्रमाणे व्यापाऱ्याकडून रोजच्या रोज दैनंदिन परवाना फी वसुलीकामी योजना राबविणेकरिता ३ वर्षासाठी मा. आयुक्तसाो, सां.मि.कु. मनपा व **प्रशासकीय मा. स्थायी समिती** ठराव क्रं. ठराव क्रं. ०५/ दि. १०/०६/२०२४ च्या मान्यतेने ३ वर्षाकरिता जाहिर ई-लिलाव करणेबाबत दि. १८ /०७ /२०२४ रोजी सांय ४ वाजेपर्यंत ई-लिलाव मागविण्यात आलेला होता.

| | |
|---|---|
| ई-लिलाव प्रसिध्द बेवसाईट | www.eauction.gov.in |
| ई-लिलाव प्रसिध्द दिनांक | दि. ०४ /०७/२०२४ |
| ई-लिलावात भाग घेणे व अनामत रक्कम भरण्याची मुदत | दि.०४/०७/२०२४ सकाळी १०.०० ते दि. १८ /०७ /२०२४ संध्याकाळी ४.०० वाजे पर्यंत |
| (लिलावधारकास पात्र -अपात्र ठरविणे ) | दि.१९/०७/२०२४ सकाळी १०.०० ते दि. १९/०७/२०२४ सायं. ५.३० वाजे पर्यंत |
| ई-लिलाव धारकास बोली लावणेची तारीख (संगणकीय प्रणाली उपलब्ध संकेत स्थळावर) | दि. २२ /०७/२०२४ सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यत. |

दैनंदिन परवाना ई-लिलावामध्ये १) संघर्ष मोहन कुंभार २) संग्राम मोहन कुंभार ३) केतन अनिल कुंभार ही पात्र लिलावधारक होती. त्यामध्ये दि. २२/०७/२०२४ रोजी ई-लिलावात बोली बोलण्यास कोणीही प्रतिसाद दिला नव्हता व नाही. त्यामुळे लिलाव प्रक्रिया स्थगित झालेली आहे.

ई-लिलावामध्ये आरंभ बोली (उच्चतम बोली ) ही निश्चित असल्याने त्यामध्ये कमी करुन, लिलाव देता येत नाही, उलट निविदामध्ये सदरची निविदा रक्कम हि कमी अगर जास्त होवू शकते, मा. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये संविधा प्रकरण ५ कलम (१) (२) (२) नुसार निविदा प्रकियामध्ये शिवाय मा. स्थायी समिती आर्थिक हित विचारात घेऊन, निविदा देवू शकते. या उलट ई-लिलाव प्रकियामध्ये हि तरतूद निदर्शनास येत नाही. हि बाब विचारात घेता सदर लिलावातील बोली धारकांनी लिलावाची अंतिम रक्कमेपेक्षा कमी रक्कमेचा दि. २३/०७/२०२४ रोजी मालमत्ता विभागाकडे अर्ज प्राप्त आहे. सदरचा अर्ज विचारात घेता, श्री. केतन अनिल कुंभार यांनी १ कोटी २ हजार ५०० रक्कमेचा अर्ज दिलेला आहे. आणखी दोन अर्ज त्या रक्कमेपेक्षा कमी आहेत.

दि.२५/०५/२०१८ मा. महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार लोकलेखा समितीने केलेल्या शिफारसीनुसार ई-निविदा किंवा ई-लिलाव करणेबाबत सुचित केलेले आहे. तसेच मा. महाराष्ट्र शासनाच्या दि. २८/०६/२०२४ च्या परिपत्रकानुसार रु. २५ कोटी पर्यंत ८ दिवसांच्या कालावधी मध्ये ई-निविदा प्रसिध्दी करणेबाबत नमूद आहे. वरील मुद्दे विचारात घेता लिलाव प्रक्रियेत अंतिम बोली रक्कम निश्चित असल्याने, त्या पेक्षा कमी घेता येत नसल्याने, तसेच निविदा प्रक्रियामध्ये सदरची रक्कम कमी अगर जादा घेण्याची तरतुद आहे.

अ) लिलाव प्रक्रिया स्थगित आहे. - यामध्ये लिलाव निश्चित रक्कम कमी करता येत नाही.

ब) लिलाव बोली पेक्षा कमी दर - श्री. केतन अनिल कुंभार यांनी १ कोटी २ हजार ५००/- मात्र अर्ज देवून दर दिलेला आहे.

क) ई-टेंडर साठी ८ दिवस कालावधी लागणार असून, मान्यता झाल्यास टेंडर प्रक्रिया करता येईल.

ड) दरम्यान मनपाचे आर्थिक नुकसान होवू नये, या करिता ई-टेंडर प्रक्रिया पूर्ण होयीस्तोपर्यंत वरिल "." मधील मागणीनुसार मा. स्थायी समिती सभेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये संविधा प्रकरण ५ कलम (१) (२) (२) नुसार १ कोटी २ हजार ५००/- मात्र या रक्कमेस ई-लिलाव शर्ती-अटी नुसार तात्पुर्ते टेंडर देण्याकामी मा. मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेऊन, प्रक्रिया करणेस मान्यता होण्यापूर्वी दि. ०२/०८/२०२४ रोजी संबंधीताना बैठकीस बोलवण्यास मा. आयुक्तसाो यांनी दि. ०१/०८/२०२४ ने मान्यता दिलेली होती. व मुलेप यांचा अभिप्राय घेणेबाबत सुचित केलेले होते. त्यानुसार दि. ०१/०८/२०२४ रोजी मुख्यलेखापरिक्षक यांनी वरील प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता दिलेली आहे.

त्यास अनुसरुन संबधीत अर्जदार यांना दि. ०२/०८/२०२४ रोजी सांयकाळी ५:०० वा. चर्चा करणेसाठी मा. आयुक्तसोा, यांचे दालनात बोलवण्यात आलेले होते. त्यावेळी मा. आयुक्तसोा, मा.उप-आयुक्तसाो, मालमत्ता कर शिल्पा दरेकर, मा. मुख्य लेखापरिक्षक शिरिष धनवे, मालमत्ता अधिक्षक लिलाव प्रक्रियामध्ये असलेले ३ लिलावधारक असे सर्वजण उपस्थितीत होते.

त्यातील सर्वात जास्त दर दिलेले अर्जदार श्री. केतन अनिल कुंभार यांनी १ कोटी १ लाख ११ हजार रुपये असा दर दिला असता, अन्य लोकांनी त्या पेक्षा दर कमी दिल्याने, तो दर मान्य करण्यात आलेला आहे. तसेच नविन ई-टेंडर पूर्वीच्या दराने प्रसिध्दी करुन, मंजूर होयीस्तोपर्यंत श्री. केतन अनिल कुंभार यांना १ कोटी १ लाख ११ हजार रुपये १ महिना किंवा ई-टेंडर प्रक्रिया पूर्ण होयीस्तोपर्यंत दराने करणेस आज दि. ०२/०८/२०२४ ने मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याबाबतचे पत्र संबंधीतानी कामगिरी करणेस दि.०२/०८/२०२४ रोजी दिलेले आहे. तसेच नविन निविदा प्रक्रिया करताना, पूर्वीच्या अटी व शर्ती कायम ठेवण्यास, व जी.एस.टी. बाबत संबधीत कंत्राटराची जबाबदारी असेल, म.न.पा.च्या आर्थिक हिताच्या दृष्टीने आणि ५ (२) (२) नुसार कार्यवाही ठेवण्यास तसेच ई-टेंडर करणेस ही मान्यता झालेली आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे कामी महापालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने १ महिना किंवा ई-टेंडर प्रक्रिया पूर्ण होयीस्तोपर्यंत श्री.केतन अनिल कुंभार यांना मनपा शर्ती-अटीनुसार १ महिन्याची अनामत रक्कम भरुन घेऊन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २ (२) चे परंतुकान्वये कामगिरी करुन घेणेस ही सभा मान्यता देत आहे

both pages signed.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०५/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- २६** दिनांक :- ०५/०८/२०२४

**विषय क्रमांक :- ०७**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (लेखा विभाग) यांचे दि.०२/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

स्थायी समिती प्रशासक ठराव क्र.१० दिनांक २६/०४/२०२४ अन्वये महापालिकेस प्राप्त होणारी शासकीय अनुदाने आणि मनपाच्या निधी खात्यामधून रक्कम काढणे,गुंतवणूक करणे, गुंतवणूक पावती मुदतपुर्व मोडणे तसेच मुदत संपल्यानंतर सदर रक्कम पुर्नगुंवणूक करण्याचे अधिकार मा.आयुक्तसो यांना देण्यात आले आहेत.

त्यानुसार वरील नमुद बाबींचे नस्ती मान्यतेचे संपुर्ण अधिकार यापुढील काळात देखील मा.आयुक्तसो यांचेकडे राहतील. केवळ याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियतील कलम ६८ मधील तरतुदीनुसार उपरोक्त नमुद केलेनुसार मनपाच्या निधीतून रक्कम काढणे,गुंतवणूक करणे, गुंतवणूक पावती मुदतपुर्व मोडणे तसेच मुदत संपल्यानंतर सदर रक्कम पुर्नगुंवणूक करणे याबाबतचे बँकांशी करावयाच्या पुर्ततेबाबतचे अधिकार उपायुक्त,मुख्यालय यांना प्रदान करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुख्यलेखाधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०५/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक** :- २७ **दिनांक :- ०५/०८/२०२४**

**विषय क्रमांक :- ०८**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०२/०८/२०२४ रोजीचे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

सन २०२३-२४ करीता महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग,शासन निर्णय क्र.- रस्ताअ-२०२३ / प्र.क्र. ६९५/नवि-१६(ई-६७०३६०),दि.०७/०६/२०२४ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे सर्वसाधारण रस्ता अनुदान योजनेअंतर्गत सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेस एकूण र.रू. १.५० कोटी मात्र मंजूर झाले आहेत. सदर कामाची कार्यान्वयन यंत्रणामहानगरपालिका आहे. सदर मंजूर अनुदानातून खालील नमूद रस्त्याचे काम प्रस्तावित केले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रू. |
|---|---|---|
| १ | सांगली येथील १) एस.टी.स्टँड ते तरूण भारत स्टेडियम, २) राजवाडा चौक ते आझाद चौक येथील रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १,४९,९९,२४३/- |
| | **एकूण** | **१,४९,९९,२४३/-** |

वर नमूद कामगिरी कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २ (१) अन्वये रितसर जाहिर ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणारे अनुषंगिक खर्चास तसेच, सदर कामगिरीचा खर्च सन २०२०४-२५ च्या अर्थसंकल्पामधील, E- १२६४) रस्ता अनुदान, या लेखाशिर्षामधुन होणेचा आहे. सद्यस्थितीत सदर लेखाशिर्षावर शुन्य तरतुद आहे. उक्त शासन निर्णयाव्दारे सर्वसाधारण रस्ता अनुदान अंतर्गत र.रु.१.५० कोटी निधी महानगरपालिकेस मंजुर आहे. सबब E- १२६४) रस्ता अनुदान या लेखाशिर्षामध्ये आवश्यक ती तरतुद करुन पुढील कार्यवाही ठेवणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०५/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- २८** **दिनांक :- ०५/०८/२०२४**

**विषय क्रमांक :- ०९**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०५/०८/२०२४ रोजीचे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

मा.सहा.आयुक्तसो मत्स्य व्यवसाय (निपास) आयुक्त मत्स्य व्यवसाय यांचेकडील जा.क्र.मत्सय/अभि/१८०१०१/६५६/२०२४ दि.०२/०८/२०२४ यांचे पत्रानुसार सदर मासळी बाजाराच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये कार्यान्वित यंत्रणा म्हणून आयुक्त कार्यालय मत्स्य व्यवसाय विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई यांची नोंद असल्यामुळे सदर कामाची निविदा प्रक्रिया मत्स्य व्यवसाय विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई यांची नोंद असल्यामुळे सदर कामाची निविदा प्रक्रिया मत्स्य व्यवसाय (निपास) आयुक्त मत्स्य व्यवसाय या कार्यालयामार्फत राबविण्यात येणार होती. तथापि, मनपाच्या दि.१४/०३/२०२४ रोजीचे पत्रान्वये उक्त कामाची निविदा प्रक्रिया ही महापालिकेमार्फत राबविण्यासाठी कळविण्यात आलेनुसार निविदा प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत राबिवणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका